**G.S.Mandal's**

**MARATHWADA INSTITUTE OF TECHNOLOGY, CIDCO, CHH. SAMBHAJINAGAR**

**Academic Year 2023-24**

**Published College Activities / News in Media**



आपण वाचत आहात देशातील सर्वात विश्वासार्ह अन् प्रथम क्रमांकाचे वृत्तपत्र

दिव्य मराठी

शुक्रवार ६ ऑक्टोबर २०२३

ंद्रीय युवा महोत्सव 2023-24 मध्ये एम.आय.टी सिडको महाविद्यालयातील
थिली गोसावी हीचे नृत्य सादरीकरण.

PRO coordinator

PRINCIPAL
M.I.T. Cidco. Aurangabad

**G.S.Mandal's**

**MARATHWADA INSTITUTE OF TECHNOLOGY, CIDCO, CHH. SAMBHAJINAGAR**

**Academic Year 2023-24**

**Published College Activities / News in Media**

सकाळ

छत्रपती संभाजीनगर, शनिवार, १२ ऑगस्ट २०२३

# बेकारांची फौज तयार करणे हा शिक्षणाचा उद्देश नाही

## कुलगुरू डॉ. येवले यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी | छत्रपती संभाजीनगर



एमआयटी सिडको महाविद्यालयात नॅशनल सेमिनारचे डॉ. येवलेंच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.

उद्योगाच्या गरजेनुसार अभ्यासक्रमाची रचना करणे आज काळाची गरज आहे. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन आणि प्रेरणेसोबतच कौशल्यावर आधारित शिक्षणावर भर द्यावा लागेल. डिग्री किंवा डिप्लोमा घेऊन बेकारांची फौज तयार करणे हा शिक्षणाचा उद्देश नाही, तर इंडस्ट्रीजला आवश्यक असलेल्या कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम देऊन त्यांना वेळेत नोकरी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. त्यामुळे यात शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. अनेक अभ्यासक्रम हे अजूनही बदललेले नाहीत. त्यासाठी आज नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची गरज आहे, असे प्रतिपादन कुलगुरू प्रा. डॉ. प्रमोद येवले यांनी केले. एमआयटी सिडको महाविद्यालय येथे नॅक प्रायोजित दोनदिवसीय नॅशनल सेमिनारचे उद्घाटन कुलगुरू डॉ. येवले यांच्या हस्ते करण्यात आले त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जी. एस. मंडळाचे संचालक मुनीश शर्मा होते. प्रो. एन. एन. बंदेला, डॉ. विष्णू पाटील, प्राचार्य डॉ. नितीन भालकीकर यांची उपस्थिती होती. उपप्राचार्य डॉ. महेंद्र कोंडेकर यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सोनल बच्छाव यांनी सूत्रसंचालन केले.

PRO coordinator

PRINCIPAL
M.I.T. Cidco. Aurangabad

**G.S.Mandal's**

**MARATHWADA INSTITUTE OF TECHNOLOGY, CIDCO, CHH. SAMBHAJINAGAR**

**Academic Year 2023-24**

**Published College Activities / News in Media**

# वार्ताहर

Date 4/10/2023

## "यशस्वी उद्योजक बनण्यासाठी प्रामाणिकपणा, शिस्त व वेळेचे नियोजन आवश्यक" - मानसिंग पवार



छत्रपती संभाजीनगर /प्रतिनिधी" यशस्वी उद्योजक बनण्यासाठी प्रामाणिकपणा, शिस्त व वेळेचे नियोजन यक" – असल्याचे प्रतिपादन मानसिंग पवार यांनी व्यक्त केले.

एमआयटी सिडको महाविद्यालयामध्ये आयोजित केलेल्या "उद्योजकता विकास" एक दिवशीय कार्यशाळेत ते होते. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी एम. आय. टी. ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट चे डायरेक्टर जनरल मुनिश शर्मा होते. द्यालयामध्ये "उद्योजकता विकास" या विषयावर ती एकदिवशीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या प्रमुख वक्ते व पाहुणे रत्नप्रभा इंडस्ट्री प्रा . लिमिटेडचे संचालक मानसिंग पवार, मा. एम. आय. टी. ग्रुप ऑफ यूटस चे डायरेक्टर जनरल मुनिश शर्मा होते.

कार्यशाळेचे उद्घाटन दीप प्रज्वलनाने मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.पुढे बोलतांना प्रमुख वक्ते मानसिंग पवार ने स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच्या भारतीय अर्थव्यवस्था व व्यवहार यांचा आढावा घेऊन सध्याच्या काळामध्ये नव क बनण्यासाठी स्वतःमध्ये प्रामाणिकपणा असणे, आवड असणे व आत्मविश्वास असणे अत्यावश्यक आहे .तसेच १९९० सालानंतर भारतीय उद्योजकता खऱ्या अर्थाने कशी वाढली यावर आपले विचार मांडले .मुंबईचे डब्बेवाले यांचे ण देऊन गेल्या १३३ वर्षांपासून ते शिकलेले नसताना ही कशे उत्कृष्ट उद्योजक आहेत याची माहिती त्यांनी

PRO coordinator

PRINCIPAL
M.I.T. Cidco. Aurangabad

**G.S.Mandal's**

**MARATHWADA INSTITUTE OF TECHNOLOGY, CIDCO, CHH. SAMBHAJINAGAR**

**Academic Year 2023-24**

**Published College Activities / News in Media**



यदा रक्षाबंधनानिमित्त बहिणीला तिचे रक्षण करण्याच्या वचनासह शौर्य, शक्ती आणि स्वावलंबनाची भेटही द्या... या गुणांतच तिचा आणि आपला आनंद सामावलेला आहे.

दिव्य मराठी

छत्रपती संभाजीनगर, बुधवार, 30 ऑगस्ट २०२३

**एमआयटीचे अध्यक्ष डॉ. यज्ञवीर कवडे यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर**

छत्रपती संभाजीनगर | देशपातळीवर अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रतिष्ठेचा मानला जाणारा 'आयइटीई जीवनगौरव पुरस्कार २०२३' तंत्रशिक्षण वाढीसाठी दिलेल्या योगदानाबद्दल एमआयटीचे संस्थापक अध्यक्ष डॉ. यज्ञवीर कवडे यांना जाहीर झाला आहे. हा पुरस्कार संस्थेच्या वार्षिक अधिवेशनात १६ सप्टेंबर रोजी पुणे येथे प्रदान करण्यात येईल, अशी माहिती आयइटीईचे अध्यक्ष डॉ. व्ही. गुणशेखर रेड्डी यांनी दिली. याबद्दल एमआयटी समूहाचे महासंचालक मुनीश शर्मा, डॉ. नितीन भालकीकर, प्राचार्य सुनील देशमुख आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.



महाराष्ट्राचा मानबिंदू

लोकमत

छत्रपती संभाजीनगर, मंगळवार, दि. २९ ऑगस्ट २०२३

**एमआयटीचे अध्यक्ष यज्ञवीर कवडे यांना आयईटीएचा जीवनगौरव**

लोकमत न्यूज नेटवर्क

छत्रपती संभाजीनगर : एमआयटी समूहाचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. यज्ञवीर आनंदराव कवडे यांना तंत्रशिक्षण क्षेत्रातील भरीव योगदानाबद्दल राष्ट्रीय पातळीवरील 'अभियांत्रिकी क्षेत्रातील प्रतिष्ठेचा 'आयइटीई जीवनगौरव पुरस्कार २०२३' जाहीर झाला आहे. हा पुरस्कार १६ सप्टेंबर रोजी पुणे येथे संस्थेच्या वार्षिक अधिवेशनात प्रदान करण्यात येणार आहे.

इन्स्टिट्यूशन ऑफ इलेक्ट्रॉनिक ॲण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअर्स (आयईटीई) या संस्थेची स्थापना १९५३ साली झाली. या संस्थेची देश विदेशात ६३ केंद्रे आणि १ लाख २५ हजार सदस्य आहेत. या संस्थेचे उपकेंद्र १९८० साली शहर स्थापन करण्यात डॉ. कवडे यांनी मोलाचा वाटा उचलला.

डॉ. कवडे यांनी मागासलेल्या मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षण घेता यावे म्हणून शाळा, तंत्रनिकेतन आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाची उभारणी केली. त्यांनी १९७५ पासूनच ग्रामीण भागात तंत्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. १९७९ साली औरंगाबाद तालुक्यातील सातारा व धाराशिव जिल्ह्यातील वाशी येथे तंत्रशिक्षण शाळा उभारल्या. १९८२ साली एमआयटी कॉलेज ऑफ ॲप्लाइड सायन्स, १९८३ ला पॉलिटेक्निक, १९८४ ला अभियांत्रिकी आणि आर्किटेक्चर कॉलेजची स्थापना केली. या संस्थेने आतापर्यंत ३० हजारांहून अधिक अभियंते घडविले आहेत.

डॉ. कवडे यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल एमआयटीचे महासंचालक प्रा. मुनिष शर्मा, डॉ. नितीन भालकीकर, संचालक डॉ. संतोष भोसले, अतिरिक्त संचालक डॉ. नीलेश पाटील, प्राचार्य सुनील पाटील, प्राचार्य किशोर पाटील यांच्यासह विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. (वा.प्र.)

PRO coordinator

PRINCIPAL
M.I.T. Cidco. Aurangabad